
Dr. Vijay Medhane receiving the Chatrapati Shivaji Maharaj Vanashri Award 2017 from Gaurdian Minister Shri.Radhakrishna Vikhe Patil, Maharastra State



Prof.Dr.Jayashree Jadhav and the Participants with the Best Performance Trophy won at State Level Inter-collegiate Folk Art Festival Competition held at Maharaja Sayajirao Gaikwad College, Malegaon.

Maratha Vidya Prasarak Samaj's

# S.V.K.T. Arts, Science & Commerce College, Deolali Camp, Nashik

## Arts Circle

**Year 2019-20**



**Savitribai Phule Pune University and Vidyarthi Vikas Mandal jointly organized state level inter-collegiate folk art festival competition at Maharaja Sayajirao Gaikwad College,Malegaon Our college won the FIRST PRIZE in this completion.**

News of the Avhan 2016 Award in Newspaper Divya MarathiNSS Programme Officer Mr. vikram Kakulte with Nashik District Level Road Safety Campaign Award 2016 with MVP Samaj Sarchitnis Smt. Neelimatai V. Pawar

दिव्य मराठी दि. 22/6/2016

सिटी कनेक्ट

सन्मान | 'आव्हान-२०१६' राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरात गौरव

# नाशिकचा रासेयो संघ ठरला राज्यात उत्कृष्ट




प्रतिनिधी | देवळाली कॅम्प

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झालेल्या 'आव्हान २०१६' या आपत्ती व्यवस्थापन राज्यस्तरीय शिबिरात उत्तम योजदानाबद्दल नाशिक जिल्ह्यातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या संघाचा 'उत्कृष्ट जिल्हा' म्हणून गौरव करण्यात आला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, कुलसचिव डॉ. नरेंद्र कडू, महाराष्ट्राचे रासेयो संपर्क अधिकारी डॉ. अतुल साळुंके व राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. संजयकुमार दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या दहा दिवसीय शिबिरात 'एनडीआरएफ'च्या जवानांनी आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले. यासाठी मविप्रच्या श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालयात झालेल्या शिबिरातून ३० विद्यार्थ्यांची निवड झाली होती. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जे. डी. सोनखासकर, रासेयो जिल्हाप्रमुख प्रा. विक्रम काकुळते, विभागप्रमुख डॉ. डी. के. आहेर, प्रा. डी. एस. बोराडे यांनी निवडप्रक्रियेचे काम पाहिले. सत्कारप्रसंगी रासेयो विद्यापीठ सल्लागार समितीचे सदस्य व दिंडोरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एन. भवरे, इगतपुरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. जे. मेधाने, सिन्नर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे, प्रा. रवींद्र अहिरे, प्रा. पवार, प्रा. नंदू नवले, प्रा. झोटिंग उपस्थित होते.

## स्वयंसेवकांचा गौरव

राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिरात उत्कृष्ट ठरलेल्या या नाशिक जिल्हा रासेयो संघाचा सत्कार मविप्र समाज संस्थेच्या सरचिटणीस नीलिमा पवार व संचालक रवींद्र देवरे यांच्या हस्ते करण्यात आला. या संघाचे नेतृत्व प्रा. विक्रम काकुळते, प्रा. गणेश पाटील व प्रा. एल. डी. जाधव यांनी केले.

## १२०० स्वयंसेवक सहभागी

शिबिरात ३६ जिल्ह्यांतून ७० कॉलेजांतील सुमारे १२०० रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला होता. 'एनडीआरएफ'च्या जवानांनी या प्रशिक्षणार्थींना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे दिले. यात देहू येथील गाथा मंदिराशेजारी इंद्रायणीच्या काठी 'वॉटर रेस्क्यू'चे प्रशिक्षणदेखील देण्यात आले.

# Avhan Best District Award 2016 Certificate

Certificate No. 1

# AVHAN

CHANCELLORS' BRIGADE: NSS WING
TRAINING CAMP ON DISASTER MANAGEMENT

'आव्हान-चान्सलर्स ब्रिगेड : आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर'

## प्रमाणपत्र / Certificate



Savitribai Phule Pune University, Pune जिल्हा / District Nashik

यांना दि. ०५ ते १४ जून २०१६ या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे परिसरात आयोजित राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरामध्ये 'उत्कृष्ठ जिल्हा पुरस्कार' प्राप्त केल्याबद्दल सदर प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

has achieved 'Best District Award' in the State Level Training Camp on Disaster Management, organized by Savitribai Phule Pune University, Pune from 05 to 14 June 2016.

**Dr. Atul Salunke**
**State Liaison Officer, N.S.S. Cell,**
Dept. of Higher & Technical Education
Government of Maharashtra

**Dr. Wasudeo Gade**
**Vice Chancellor**
Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune

Aw

NSS Programme Officer Mr. vikram Kakulte with Nashik District Level Road Safety Campaign Award 2016 with MVP Samaj Sarchitnis Smt. Neelimatai V. Pawar



Nashik District Road Safety Campaign 2016 Award Certificate



प्रमाणपत्र

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

राष्ट्रीय सेवा योजना

एस.व्ही.के.टी. महाविद्यालय,

नाशिक

यांना

नाशिक जिल्हास्तरीय रस्ता सुरक्षा अभियान २०१६

पुरस्कार मिळाल्याबद्दल

सदर प्रमाणपत्र सन्मानपुर्वक प्रदान करण्यात येत आहे.

डॉ. संजयकुमार दळवी
कार्यक्रम समन्वयक

डॉ. वासुदेव गाडे
कुलगुरु



Prin. Dr.Smt.J.D.Sonkhaskar , NSS Programme Officer receiving **ROAD SAFETY AWARD 2016** from Vice-Chancellor Dr. Vasudev Gade

News in Sakal Newspaper of Road Safety Campaign Award 2016

नाशिक, बुधवार, १० ऑगस्ट २०१६ । किंमत ₹ ४ ■ पाने २० (१२ + ८)

# सकाळ



देवळाली कॅम्प : कुलगुरू वासुदेव गाडे यांच्या हस्ते रस्ता सुरक्षा अभियानाचा पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. जे. डी. सोनखासकर, प्रा. विक्रम काकुळते, प्रा. सुनीता आडके, संजय कदम आदी.

## रस्ता सुरक्षा अभियान पुरस्कार 'एसव्हीकेटी'ला प्रदान

### अभियान प्रभावीपणे राबविल्याबद्दल गौरव

सकाळ वृत्तसेवा

देवळाली कॅम्प, ता. ९ : 'मविप्र' समाजाच्या श्रीमती विमलाबेन खिमजी तैजूकाया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठअंतर्गत रस्ता सुरक्षा अभियानाचा पुरस्कार कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

विद्यापीठात नामदेव सभागृहात झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक गुणगौरव समारंभात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जे. डी. सोनखासकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. विक्रम काकुळते, प्रा. सुनीता आडके आणि ग्रंथालयातील संजय कदम यांना प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयाने गेल्या वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत रस्ता सुरक्षा अभियान प्रभावीपणे राबविले. या अंतर्गत संस्थेच्या महाविद्यालयात मोटारसायकलने येताना हेल्मेटशिवाय प्रवेश दिला जात नाही. नाशिक रोड येथील बिटको चौकात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी विविध बॅनर हातात घेऊन विविध नियमांचे पालन प्रत्येकाने करायला हवे, सिग्नल सुरू असताना गाडी बंद करायला हवी अशा प्रकारे उद्बोधन केले. या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. संजयकुमार दळवी, मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय खरात आणि पाचगणी येथील बहाई संस्थेचे डॉ. लेसन आजादी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष प्रतापदादा सोनवणे, नितीन ठाकरे, सरचिटणीस नीलिमा पवार, उपसभापती नानाजी दळवी, चिटणीस सुनील ढिकले, नाशिक तालुका संचालक नाना महाले, मुरलीधर अण्णा पाटील आणि तुषार शेवाळे यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले आहे.

News in  Dainik Divya Marathi  Newspaper of Road Safety Campaign 2016

Award

दैनिक दिव्य मराठी

नाशिक ॲक्टिव्हिटी

गौरवास्पद | वर्षभर राबवलेल्या जनजागृतीपर उपक्रमांची पुणे विद्यापीठाकडून दखल

# रस्ता सुरक्षा अभियान पुरस्कार तेजुकाया महाविद्यालयास प्रदान



मविप्रच्या तेजुकाया महाविद्यालयाला प्राप्त झालेल्या रस्ता सुरक्षा अभियानाचा पुरस्कार कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांच्या हस्ते स्वीकारताना प्राचार्या डॉ. जे. डी. सोनखासकर. समवेत प्रा. विक्रम काकुळते, प्रा. सुनीता आडके, संजय कदम यांसह पुणे विद्यापीठाचे पदाधिकारी.

## विशेष सोहळ्यात कुलगुरूंकडून गौरव

प्रतिनिधी | नाशिक

येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळाली कॅम्प या महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत रस्ता सुरक्षा अभियानाचा पुरस्कार सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पुणे विद्यापीठात नामदेव सभागृहात झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक गुणगौरव समारंभात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जे. डी. सोनखासकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. विक्रम काकुळते, सकाळ सत्रप्रमुख प्रा. सुनीता आडके व ग्रंथालयातील संजय कदम यांनी हा पुरस्कार स्वीकारला. महाविद्यालयाने मागील वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत रस्ता सुरक्षा अभियान प्रभावीपणे राबविले. यात महाविद्यालयात मोटारसायकलने येताना हेल्मेटसक्ती, बिटको सिग्नलवर रासेयो विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर फलक हातात घेऊन विविध नियमांचे पालन करण्याबाबत, सिग्नलवर वाहन बंद करून इंधन बचत करणे यांबाबत नागरिकांचे उद्‌बोधन केले. त्यास चांगला प्रतिसादही मिळाला. ट्रॅफिक विभागाचे हनुमंत गाडे यांनीही महाविद्यालयाचे कौतुक केले. आठवड्यातील एक दिवस सार्वजनिक वाहनाचा महाविद्यालयात येताना वापर या निर्णयाचेही त्यांनी स्वागत केले. यावेळी रासेयो समन्वयक डॉ. संजयकुमार दळवी, मॉडर्न कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय खरात व पाचगणी येथील बहाई संस्थेचे डॉ. लेसन आदी उपस्थित होते.

या यशस्वी कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रतापदादा सोनवणे, सभापती नितीन ठाकरे, सरचिटणीस नीलिमा पवार, उपसभापती नाना दळवी, चिटणीस सुनील ढिकले, नाशिक तालुका संचालक नाना महाले, मुरलीधर अण्णा पाटील व तुषार शेवाळे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

## जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनखासकर यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने जनजागृतीपर उपक्रम राबवले जातात. मागील वर्षी याच महाविद्यालयाला सर्वांत जास्त रक्तदान केल्याबद्दल पुरस्कार मिळाला होता. राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गतही विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. त्यात नाम फाउंडेशनला एक लाखाचा निधी, सेवक वर्ग व विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या धान्याचे अनाथ मुलांच्या वसतिगृहात वाटप आदी उपक्रमांचा उल्लेख होतो.

## 'रासेयो' प्रमुखांचाही विशेष सत्कार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय आव्हान शिबिराचे जिल्हास्तरीय आयोजन याच महाविद्यालयात होऊन ३६ जिल्ह्यातून नाशिक जिल्ह्याला उत्कृष्ट जिल्हा म्हणून गौरविण्यात आले होते. या विजयी संघाचे नेतृत्व रासेयोप्रमुख प्रा. विक्रम काकुळते यांनी केले होते. या यशस्वी कामगिरीबद्दल त्यांचाही या विशेष सोहळ्यात कुलगुरू डॉ. गाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

— ९ ऑगस्ट २०१६ —

Dr. Vijay Medhane receiving the Chatrapati Shivaji Maharaj Vanashri Award 2017 from Gaurdian Minister Shri.Radhakrishna Vikhe Patil, Maharastra State



